महा मेट्रो

PUNE METRO

# पुणे मेट्रो साठी दुसरा ट्रेन संच लवकरच शहरात दाखल होणार






**पुणे , २४।१२।२०१९** : पुणे मेट्रोची बांधकाम , रेल टाकण्याचे काम , विद्युत तारांचे काम , सिग्नल सिस्टिम चे काम इत्यादी कामे प्रगतीपथावर असून लवकरच पुण्यामध्ये मेट्रोचे दोन ट्रेन संच दाखल होणार आहे. एका ट्रेन संचात तीन मेट्रो कोच असणार आहेत . एक ट्रेन संच दि . २२।१२।२०१९ ला पुण्यासाठी निघाले असून दुसरा संच आज दि . २४।१२।२०१९ रोजीला ला पुण्यासाठी निघाला आहे . हे ट्रेन संच नागपूर मेट्रोला देण्यात येणाऱ्या नवीन ट्रेन संचाच्या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत सीआरआरसी कडून घेण्यात येत आहे. पुण्याला मिळणाऱ्या दोन्ही संच नवीन असून त्यांच्या प्राथमिक चाचण्या नागपूरला करण्यात आल्या आहेत .सध्या पुणे येथे कोचिंग डेपो ची काम पूर्ण झाले नसल्यामुळे या ट्रेन संचाला पहिल्यांदा नागपूरला नेण्यात आले व आवश्यक ती उपकरणाची जोडणी करण्यात आली आहे. व पुणे मेट्रो बाह्य रंगसंगती तसेच त्याची रंगरंगोटी करून हे ट्रेन संच पुण्यासाठी निघाले आहेत. ट्रेन संच पुण्यात दाखल झाल्यावर पुणेकरांना मेट्रो कोच बघायला मिळणार आहे . आतापर्यंत पुणेकरांना मेट्रोचे विविध अंगे बघितली आहेत परंतु ज्या मेट्रो कोचमध्ये पुणेकर प्रवास करणार आहेत. त्याचा प्रत्यक्ष अनुभव लोकांना आता घेता येणे शक्य होणार आहे. मेट्रो कोच मध्ये असलेली बैठक व्यवस्था , सूचना प्रणाली , व इतर गोष्टींची जवळून अनुभव लोकांना आता बघता येइल . हे ट्रेन संच पुण्यात दाखल झाल्यावर पीसीएमसी येथील उन्नत मार्गावर ते चढवण्यात येणार आहे.व त्याद्वारे मेट्रो ट्रेनची चाचणी सुरु होईल .

हे ट्रेन संच पूर्णतः स्टेनलेस स्टील या धातूपासून बनविले आहेत. वजनाला हलके असलेल्या या ट्रेन संचामध्ये अत्याधुनिक एलईडी प्रकारचे दीवे लावलेले असून बाह्यप्रकाशाच्या तीव्रतेचे आतील दीवे आपोआप कमी अधिक तीव्र करण्याची यंत्रणा यात आहे. या ट्रेन चा अधिकतम वेग ९० किमी असणार आहे. या ट्रेन मध्ये मोबाईल , लॅपटॉप , चार्जिंग सुविधा असून प्रवाशांसाठी दृक

श्राव्य सूचनाप्रणाली असणार आहे. आज दि. २4.१२.२०१९ रोजी हे ट्रेन चे संच नागपूरहून रॉड द्वारे मोठ्या ट्रक मध्ये लादुन पुण्यासाठी निघाले आहेत.